MHAU060015212025

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३४०/२०२४**

**मलखान महादू चव्हाण वि. निरंक**

**निशाणी क्र.१ खालील आदेश**

१. अर्जदाराने सदरचे प्रकरण हे बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट अन्वये वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळण्यासाठी दाखल केलेले आहे.

२. महादू धनसिंग चव्हाण हे दिनांक १९.०३.२०१६ रोजी मौजे शिवतांडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र.१, २, ४ व ५ हे मयताची मुले व मुली आहेत व अर्जदार क्र.३–अ ते ३–ड हे मयताचे नातू व नात आहेत. मयताचा मुलगा अर्जदार क्र.३ ताराचंद महादू चव्हाण हे दिनांक ०१.१०.२००१ रोजी मयत झालेले आहेत. मयत महादु धनसिंग चव्हाण यांच्या पत्नी पोबाबाई महादू चव्हाण या सन–२०१० साली मयत झालेल्या आहेत. मयत महादु धनसिंग चव्हाण यांच्या आई सबळीबाई धनसिंग चव्हाण या सन–२०१४ साली मयत झाल्या आहेत. मयत ताराचंद महादू चव्हाण यांची पत्नी ग्यारशीबाई ताराचंद चव्हाण या देखील सन–२०१४ साली मयत झाल्या आहेत. मयत महादु धनसिंग चव्हाण यांना अर्जदार क्र. १, २, ३–अ ते ३–ड, ४ आणि ५ शिवाय कोणीही वारस नाहीत. त्यामुळे, अर्जदार हेच मयत महादु धनसिंग चव्हाण यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

३. अर्जातील कथनाच्या सत्यतेसाठी अर्जदार क्र.१ यांनी स्वतःचे सरतपासणीचे शपथपत्र निशाणी क्र. ११ नुसार अभिलेखावर दाखल केले असुन सदर शपथपत्रात अर्जातील कथनाचा पुनरुल्लेख केला आहे.

४. अर्जदाराने अर्जासोबत मयत महादु धनसिंग चव्हाण, ताराचंद महादु चव्हाण यांचे मृत्यु प्रमाणपत्र, मयत पोबाबाई महादू चव्हाण, ग्यारशीबाई ताराचंद चव्हाण आणि सबळीबाई धनसिंग चव्हाण यांचे अनुपलब्धतेचे प्रमाणपत्र व दोन व्यक्तीचे शपथपत्र, अर्जदार क्र. १, २, ३–अ, ३–ब व ३–ड, ४ आणि ५ यांच्या आधार कार्डची झेरॉक्स

प्रत आणि अर्जदार क्र. ३–क याचा रहिवाशी दाखला नि.क्र. ४ लगत दाखल केलेला आहे. तसेच अर्जदारातर्फे पुरावा बंद पुरसिस नि.क्र.१२ अन्वये दाखल केली आहे.

५. अर्जदाराने अर्जाच्या अनुषंगाने न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र 'सामना' या दिनांक २०.११.२०२४ रोजीच्या अंकात जाहीर प्रगटन प्रसिध्द निशाणी क्र. १० अन्वये दाखल करण्यात आले. मात्र मुदतीत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही.

६. वरील कागदपत्रांच्या अनुषंगाने अर्जदारांनी मागणी केल्याप्रमाणे अर्जदार हेच त्यांच्या नावे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र असल्याबाबतचे दिसुन येत आहे. त्यामुळे कायदेशीर वारस प्रमाणपत्र अर्जदार यांच्या नावे देणे न्यायोचीत होईल म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश करते.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |
| २ | अर्जदार क्र.१ मलखान महादू चव्हाण, अर्जदार क्र.२ आलम महादू चव्हाण, अर्जदार क्र.३–अ गणेश ताराचंद चव्हाण, अर्जदार क्र.३–ब सुनिल ताराचंद चव्हाण, अर्जदार क्र.३–क रंगराव ताराचंद चव्हाण, अर्जदार क्र.३–ड गीताबाई संजय राठोड, अर्जदार क्र.४ गंगाबाई उत्तम राठोड व अर्जदार क्र.५निर्मलाबाई बाबू पवार हे मयत **महादु धनसिंग चव्हाण** यांचे वारस असुन तसे प्रमाणपत्र आवश्यक ते न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर जारी करण्यात यावे. |
| ३ | अर्जदाराने अर्जाचा खर्च सोसावा. |
| ४ | अर्ज निकाली काढण्यात येतो. |

(अर्जाचा निकाल खुल्या न्यायालयात उद्घोषित करण्यात आला.)

RUPALI SURESHCHANDRAJI TAPADIYA
Digitally signed by RUPALI SURESHCHANDRAJI TAPADIYA
Date: 2026.04.23 14:58:28 +0530

**दिनांक – २३.०४.२०२६**
**कन्नड.**

**(सौ. आर. एस. तापडीया)**
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,**
**न्यायालय क्र. ३, कन्नड.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

Name of the Stenographer : Rajesh M. Sonawane

Name of the Court : 2nd Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Kannad
Date of the Order : 23.04.2026
Order signed by the
Presiding Officer on : 23.04.2026
Order uploaded on : 23.04.2026